# मुकुल माधव फाउंडेशनचे सेरेब्रलग्रस्तांसाठी सल्ला केंद्र

**पुणे** : सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाउंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थकेअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्ला केंद्र उघडणार आहे. तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळविता येईल, अशी माहिती मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी दिली.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेअरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी खासदार उदयनराजे भोसले, दमयंतीराजे भोसले, साताऱ्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुद्‌गल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि.चे सीईओ झाल कूपर, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम इस्पितळाच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.

मुकुल माधव फाउंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत 74 व्हिलचेअर्स आणि 52 कमोड खुर्च्या भेट देण्यात आल्या आहेत. रितू छाब्रिया म्हणाल्या, या मुलांना तसेच त्यांच्या मातांना पुण्यातील . तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व समुपदेशन केले जाणार आहे. यामुळे परिणामकारक उपचार होण्यास मदत होणार आहे.